स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

कला शाखे अंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी. पदवीकरीता सादर करावयाच्या शोधप्रबंधाची रुपरेषा

शोधप्रबंधाचा विषय

''आंबेडकरी चळवळीतील निवडक कादंबऱ्यांचा विवेचक अभ्यास''

(निवडक कादंबऱ्या :- भिम युग, सनातन, श्रद्धा, भेटलं मांग फिटल पांग, सुंभ आणि पिळ, ठणक, वॉन्टेड, फिरकी)

मानव्यविद्या शाखे अंतर्गत

पीएच.डी. (मराठी) पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाची रुपरेषा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

:: संशोधक ::

प्रा. कांबळे पांडुरंग पंढरी

महात्मा फुले महाविद्यालय, किनगाव ता. अहमदपूर जि. लातूर

:: मार्गदर्शक ::

प्रा.डॉ. कांबळे अनिल पंढरीनाथ

मराठी विभाग प्रमुख

महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर

ता. अहमदपूर जि. लातूर

:: संशोधन केंद्र ::

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर

ता.उदगीर जि. लातूर

‘‘आंबेडकरी चळवळीतील निवडक कादंबऱ्यांचा विवेचक अभ्यास’’

(भिम युग, सनातन, श्रद्धा, भेटलं मांग फिटल पांग, सुंभ आणि पिळ, ठणक, वॉन्टेड, फिरकी)

प्रस्तावना :

जगभरामध्ये विविध देशात वेगवेगळ्या सामाजिक चळवळी चालवल्या जात होत्या. आताही विविध सामाजिक चळवळी समाजामध्ये सुरु आहेत. काळाच्या ओघात काही सामाजिक चळवळी नष्ट झालेल्या आहेत. पूर्वीपासून आतापर्यंत ज्या निरनिराळ्या सामाजिक चळवळी सुरु आहेत त्यामध्ये दलित चळवळ किंवा आंबेडकरी चळवळ ही एक महत्वपूर्ण सामाजिक चळवळ आहे. या आंबेडकरी चळवळीला मराठी साहित्यामध्ये महत्वपूर्ण मानले जात आहे. आंबेडकरी साहित्याची चळवळ हा एक वेगळा विषय आंबेडकरी चळवळी अंतर्गत चालवला जातो. मराठी साहित्याच्या विश्वातही आंबेडकरवादी साहित्याचे योगदान महत्वपूर्ण आहे. समग्र मराठी साहित्याला विविध अंगाने विकसित करण्याचे कार्य अनेक दलित साहित्यिकांनी केलेले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक प्रेरणेने व आंबेडकरी चळवळ पुढे चालवण्याच्या अनुषंगाने अनेक आंबेडकरवादी लेखकांनी महत्वपूर्ण साहित्य निर्माण करुन दलित चळवळीला दिशा देण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या सर्वांना ज्ञात आहे की, साहित्य हा समाज जीवनाचा आरसा असतो. साहित्यातून मानवी जीवनाचे चित्रण होत असते. आंबेडकरवादी साहित्य प्रामुख्याने प्रस्थापित समाज व्यवस्थेला विरोध करुन नवीन समाजव्यवस्था कशी निर्माण झाली पाहिजे या संबंधाने लिहिले गेलेले आहे. प्रस्थापित समाजाने दलितावर केलेले अन्याय, अत्याचार अनेक आत्मकथनाच्या माध्यमातून व्यक्त केलेले आहेत.

मराठी साहित्य विश्वातील आंबेडकरवादी साहित्य हा एक महत्वाचा साहित्य प्रवाह म्हणून ओळखला जातो. महाराष्ट्रामध्ये महात्मा फुले, डॉ.आंबेडकर आणि इतर महापुरुषांच्या विचार आणि कार्याने प्रभावित होऊन आंबेडकरवादी लेखकाने साहित्याच्या माध्यमातून समता, स्वातंत्र्य,

बंधुता आणि न्याय या मूल्यांसाठी लढा उभा केला, खरं म्हणजे आंबेडकरी चळवळीची हीच प्रमुख प्रेरणा आणि उद्देश होता. या लढ्याला पुढे घेऊन जाण्यामध्ये वेगवेगळ्या समाज घटकांनी प्रयत्न केलेले आहेत. त्यापैकीच आंबेडकरी चळवळीला, आंदोलनाला पुढे घेऊन जाण्यामध्ये आणि एक दिशा देण्यामध्ये दलित लेखकांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून प्रयत्न केलेला आहे. दलित साहित्याची विद्रोही चळवळ ही एकूण आंबेडकरी चळवळीमध्ये महत्वपूर्ण मानली जाते. महाराष्ट्रातील दलित तरुणांच्या दलित पँथर आणि दलित साहित्य ह्या चळवळी इतर प्रदेशातल्या दलित तरुणांचे लक्ष आकर्षित करणाऱ्या ठरल्या आहेत. दलित तरुणांनी आपल्या राज्यात दलित तरुणांच्या संघटना स्थापन केल्या. त्या संघटना स्थापन करण्यामध्ये आणि या नव तरुणांना योग्य दिशा देण्यामध्ये संपूर्ण आंबेडकरवादी लेखकांची किंवा साहित्यिकांची महत्वपूर्ण भूमिका राहिली आहे.

महात्मा फुले आणि आंबेडकरांच्या विचारांचे लोण त्या काळामध्ये संपूर्ण देशभरात पोहोचलेले होते. विसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकामध्ये दलित साहित्याच्या अनुषंगाने विपुल अशी चर्चा मराठी साहित्यात झालेली दिसते. पांढरपेशी साहित्यिकांनी यावर प्रचंड अशी टीकाही केली. दलितांनी लिहिलेल्या आत्मवेदना, विद्रोह, चिड, बंड हे साहित्यच होऊ शकत नाही अशी एक विचारधारा त्या काळामध्ये मराठी साहित्यात अस्तित्वात होती. परंतु त्याकडे दुर्लक्ष करुन आंबेडकरवादी लेखकाने आपले स्वअनुभव इथल्या प्रस्थापित समाज व्यवस्थेने लादलेले लाजिरवाणे जिने साहित्यातून व्यक्त करण्याचा प्रयत्न केला. त्या अनुषंगाने पहिल्यांदाच दलित आत्मकथने मोठ्या प्रमाणामध्ये दलित साहित्यात लिहिली गेली. दलित आत्मकथना बरोबरच दलित साहित्यामध्ये वैचारिक साहित्य हे देखील मोठ्या प्रमाणामध्ये लिहिले गेले आहे. समाज परिवर्तनासाठी समाजाला योग्य दिशा देण्यासाठी दलित समाजातील नवतरुणांनी योग्य शिक्षण घेतले पाहिजे. यासाठी समाजामध्ये असलेल्या अंधश्रद्धा, रुढी, प्रथा, परंपरा बंद करण्यासाठी आणि त्या ठिकाणी विज्ञानवादी वृत्तीची जोपासना करण्यासाठी दलित साहित्यिकांनी वैचारिक

लेखनाच्या माध्यमातून महत्वाची भूमिका बजावलेली दिसून येते. आंबेडकरवादी साहित्य हे स्वातंत्र्योत्तर काळातल्या सांस्कृतिक आणि सामाजिक परिस्थितीचे अपत्य आहे. दलित साहित्य हे दलितांच्या मुक्तीचे साधन मानले जाते. दलितांच्या सर्व प्रकारच्या हक्काची कैफियत म्हणूनच आंबेडकरवादी साहित्याकडे पाहिले जाते.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर मराठी साहित्यामध्ये दलितांच्या आशा, आकांक्षा आणि त्यांचा झालेला भ्रमनिरास यांचे प्रतिबिंब पडलेले दिसते. दलितांच्या समग्र सांस्कृतिक चळवळीची सनद म्हणून जेंव्हा आपण दलित साहित्याकडे आपण पाहतो तेंव्हा आंबेडकरवादी साहित्य हे मानवी मूल्यांची आणि मानवी अधिकारांची भाषा बोलते. दलित साहित्य हे दलितांच्या चळवळीचे एक अंग आहे. कोणत्याही चळवळीला विशेष अशा विचाराची दिशा देण्याची गरज असते. चळवळ विशेषतः अशा विचारावर आधारलेली असते चळवळीला दिशा देण्याचे कार्य समाजातील बुद्धिवंत लेखक, साहित्यिक करत असतात. आंबेडकरी चळवळीला खूप मोठा इतिहास लाभलेला आहे. चळवळ आणि साहित्य या अनुषंगाने चर्चा करताना आंबेडकरवादी साहित्याला आपल्याला विचारात घ्यावे लागते. आंबेडकरवादी साहित्य हे प्रामुख्याने दलितांच्या समस्या त्यांचे जीवन आणि प्रश्न यांनी व्यापलेले आहे. हे सर्व प्रश्न, व्यथा,वेदना इथल्या प्रस्थापित वर्ण आणि जातीव्यवस्थेने निर्माण केलेले आहेत. हे कोणीही नाकारु शकणार नाही. दलितांची ही उपेक्षा, अवहेलना यास आंबेडकरवादी साहित्यामध्ये महत्वाचे स्थान दिलेले दिसते.

आंबेडकरवादी साहित्य विकसित करण्यामध्ये अनेक आंबेडकरवादी लेखकांची महत्वपूर्ण भूमिका राहिलेली आहे. १९६० नंतर निर्माण झालेले साहित्य हे मराठी साहित्य विश्वाला एक विशिष्ट अशी दिशा आणि स्वरुप प्राप्त करुन देणारे ठरले आहे. दलित साहित्यकारांचे व साहित्याचे आपण स्थूल मानाने तीन टप्पे करु शकतो इ.स. १९६० ते १९८०, १९८०-२००० आणि २००० ते २०२२ च्या तीन कालखंडा दरम्यानचे आंबेडकरवादी लेखक आणि त्यांचे

साहित्य. १९८० ते २००० आणि २००० ते २०२२ च्या दरम्यानचे आंबेडकरवादी लेखक आणि त्यांचे साहित्य अशा तीन टप्प्यांमध्ये आपण संपूर्ण आंबेडकरवादी साहित्याचे वर्गीकरण करु शकतो. एकूण आंबेडकरवादी साहित्याचा आढावा घेत असताना असे लक्षात येते की, आंबेडकरी साहित्याची संपूर्ण दलित समाजाच्या अनुषंगाने आणि विशेषतः आंबेडकर चळवळीच्या संदर्भामध्ये महत्वाची भूमिका राहिलेली आहे. इ.स. २००० च्या नंतर ज्या आंबेडकरवादी तरुण लेखकांनी मराठी साहित्यामध्ये कथा, कादंबरी, ललित गद्य आणि पद्य आणि इतर वाङ्मय प्रकार हाताळले त्यापैकी प्रस्तुत संशोधनामध्ये २००० नंतरच्या आंबेडकवादी चळवळीतील निवडक कादंबऱ्यांचा विवेचक अभ्यास केला जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने समाज जीवनावर ज्या प्रमुख कादंबऱ्याचा प्रभाव राहिला आहे. भिम युग, सनातन, श्रद्धा, भेटलं मांग फिटल पांग, सुंभ आणि पिळ, ठणक, वॉन्टेड, फिरकी अशा कादंबऱ्याचे चिकित्सक विवेचन प्रस्तुत संशोधनामध्ये करणार आहे. हे संशोधन करत असताना तटस्थपणे आंबेडकरवादी साहित्यिकांची मराठी साहित्यामधील भूमिका आणि आंबेडकरवादी साहित्यिकांची आंबेडकरी चळवळीमध्ये असणाऱ्या भूमिकांचे तटस्थपणे विश्लेषण केले जाणार आहे.

साधारणपणे आंबेडकरवादी वाङ्मयाचा उदय आणि विकासाच्या संदर्भात अनेक मत मत्तांतरे मराठी साहित्य विश्वात दिसून येतात असे असले तरी आंबेडकरवादी वाङ्मयाचा उदय १९६० नंतरच्या काळात झाला आहे. वेदना, विद्रोह आणि नकार ही आंबेडकरी चळवळीची प्रमुख वैशिष्ट्ये मानली जातात. तसेच वेदना, नकार, विद्रोह ही आंबेडकरी किंवा दलित साहित्यातील महत्वाची तत्त्वे आहेत. स्वातंत्र्य, समता, बंधुता, विज्ञाननिष्ठा, न्याय आणि लोकशाही ही मूल्ये दलित साहित्याचा मुलाधार आहेत. हिंदू समाज व्यवस्थेमध्ये जातीव्यवस्था आहे. त्यामुळे उच्च जात व कनिष्ठ जात अशी विषमता असून दलितत्व हे या विषयाचे अपत्य आहे. दलितावर या विषमतावादी समाज व्यवस्थेने पिढ्यान् पिढ्या अन्याय केला आहे. त्याला विरोध करण्यासाठी दलितांनी त्यांचे लढण्याचे एक हत्यार म्हणून दलित साहित्य लिहीले. त्यामुळे दलित लेखकांची

जबाबदारी या विषमतेविरुद्ध लेखन करुन लढा देणे ही आहे असे हा साहित्य प्रवाह मानतो. ही जबाबदारी स्पष्ट करताना अण्णाभाऊ साठे म्हणतात, आम्ही आंबेडकरवादी साहित्यिकांनी दलितांना वास्तव जगण्याच्या सर्व जन्मातून मुक्त करणारे साहित्य निर्माण केले पाहिजे असे म्हणतात. आपल्या सर्वांना माहितीच आहे की शत्रूवर मात करण्यासाठी शस्त्र किंवा आयुध पेक्षाही विचार फार मोठे शस्त्र आहे. ही इतिहासाची साक्ष असून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देखील रक्तपात विरहित समाज परिवर्तनासाठी शब्द शस्त्रांचा वापर करुन आपल्या तत्त्वज्ञानाच्या सामर्थ्यावर भारतीय समाजात परिवर्तन घडवून आणले. अण्णाभाऊ साठे यांनी त्याच शब्द सामर्थ्याची जाणीव ठेवून समाजप्रबोधनासाठी लेखन माध्यम उपयुक्त असल्याने आंबेडकरवादी साहित्यिकांना सांगितले व त्याप्रमाणे स्वतः लेखन केले. आंबेडकरवादी कथा लिहून त्यांनी मोलाचे कार्य केले आहे. या सबंध विश्लेषणावरुन असे लक्षात येते की, आंबेडकरवादी साहित्यकारांची समाज परिवर्तनामध्ये महत्त्वाची भूमिका राहिलेली आहे. समाज परिवर्तनासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जी आंबेडकरी चळवळ सुरु केली त्यामध्ये दलित लेखकांची भूमिका महत्त्वाची राहिलेली आहे. या वरील सर्व आंबेडकरवादी साहित्याचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की, आंबेडकरी चळवळीमध्ये कादंबरी हा वाङ्मय प्रकार अत्यंत प्रभावशाली आहे. या अनुषंगाने प्रस्तुत संशोधन विषयामध्ये २००० नंतरच्या महत्त्वाच्या कादंबऱ्यांचा विवेचक अभ्यास केला जाणार आहे त्यासंबंधीची रुपरेषा खालील प्रमाणे असणार आहे.

१) संशोधन विषयाची निवड :

मराठी साहित्य विश्वामध्ये वेगवेगळ्या अनुषंगाने आत्तापर्यंत संशोधने झालेली आहेत. कथा, कादंबरी, कविता, ललित साहित्य आणि इतर साहित्य प्रकाराचा वेगवेगळ्या अंगाने संशोधनात्मक अभ्यास झालेला आहे. मराठीमध्ये ज्या काही वेगवेगळ्या कादंबऱ्या आहेत

त्यांचाही अभ्यास करण्यात आलेला आहे. परंतु आंबेडकरवादी कादंबऱ्यांचा आंबेडकरी चळवळीच्या अनुषंगाने फारसा अभ्यास झालेला नाही. आंबेडकरी चळवळीमध्ये आंबेडकरवादी कादंबरीने कोणती भूमिका केलेली आहे किंवा आंबेडकरी चळवळीत आंबेडकरवादी कादंबरीकारांची कामगिरी किंवा योगदान कोणते या अनुषंगाने अभ्यास झालेला दिसून येत नाही. ही एक उणीव संशोधकाला लक्षात आल्याने संशोधकांने मार्गदर्शकाशी चर्चा करुन प्रस्तुत संशोधनासाठी आंबेडकरी चळवळीतील कादंबऱ्याचा विवेचक अभ्यास हा विषय संशोधनासाठी निश्‍चित केला आहे.

२) संशोधन विषयाचे महत्व :

प्रस्तुत संशोधन विषयाचा संशोधनात्मक अभ्यास केल्यानंतर या विषयामुळे आंबेडकरवादी कादंबरीचे आणि आंबेडकरी चळवळीचे परस्पर संबंध स्पष्ट होण्यास मदत होणार आहे. आंबेडकरवादी कादंबरी पैकी महत्वाच्या अशा कादंबऱ्यामध्ये आंबेडकरवादी चळवळीला कशी दिशा मिळण्यास मदत झाली हे माहीत होण्यास मदत होईल. तसेच प्रस्तुत संशोधनामुळे चळवळीला दिशा देण्यासाठी साहित्य कसे आवश्यक असते याचीही माहिती होण्यास मदत होणार आहे. कादंबऱ्यामधून व्यक्त झालेले सामाजिक जीवन बदलण्यासाठी संबंधित समूह चळवळीकडे कसे आकर्षिले गेले किंवा जातात हेही यातून स्पष्ट होईल. चळवळ करण्यासाठी संबंधित घटकाला प्रेरित करणे गरजेचे असते ही प्रेरणा देण्याचे कार्य काही निवडक कादंबऱ्याच्या मधून कसे झालेले आहे याचीही माहिती प्रस्तुत संशोधनामुळे होणार आहे.

३) संशोधन व षियाची उद्दिष्ट्ये :-

प्रस्तुत संशोधन विषयासाठी खालील प्रमाणे संशोधन विषयाची उद्दिष्ट्ये निश्‍चित करण्यात आली आहेत.

१) आंबेडकरवादी कादंबरीचे आणि आंबेडकरी चळवळीचे परस्पर संबंध समजून घेणे.

२) आंबेडकरवादी कादंबरींचा आंबेडकरी चळवळीवरील असलेला प्रभाव अभ्यासणे.

३) आंबेडकरवादी कादंबरीमुळे चळवळीला मिळालेली दिशा समजून घेणे.

४) आंबेडकरवादी कादंबरीकारांची आंबेडकरी चळवळीशी असणारी भूमिका समजून घेणे.

४) संशोधन विषयाची गृहीतकृत्ये :

१) आंबेडकरवादी कादंबरीचे आणि आंबेडकरी चळवळीचे परस्पर संबंध असलेले दिसून येतात.

२) आंबेडकरी चळवळीवर आंबेडकरवादी कादंबरीचा सुरुवातीपासून प्रभाव राहिलेला आहे.

३) आंबेडकरवादी साहित्यामुळे आंबेडकरी चळवळीला विशिष्ट दिशा मिळण्यास मदत झाली आहे.

४) आंबेडकरवादी कादंबरीकारांची किंवा दलित साहित्यिकांची आंबेडकरी चळवळीशी भूमिका ही परिवर्तनवादाची आहे.

५) संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी विश्लेषणात्मक आणि वर्णनात्मक पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. संशोधन आराखड्यातील वर्णनात्मक आराखडा या संशोधनासाठी निवडला जाईल. मराठी साहित्यामध्ये एकूण ज्या आंबेडकरवादी साहित्यिकांनी लिहिलेल्या कादंबऱ्या आहेत त्यांचे आंबेडकरी चळवळीशी असलेले नाते स्पष्ट करताना कादंबरीच्या मधून प्राप्त झालेली तथ्ये विश्लेषित करुन त्यातून आंबेडकरवादी कादंबरी आणि आंबेडकरी चळवळ यांचा परस्पर संबंध स्पष्ट करण्यात येणार आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक असणारी तथ्य संकलन हे प्रकाशित असणाऱ्या

कादंबऱ्यातून प्राप्त केले जाणार आहे. इ.स. २००० नंतर आंबेडकरवादी लेखकांनी लिहिलेल्या कादंबऱ्या हा या शोधनिबंधाचा तथ्य प्राप्तीचा प्रमुख स्त्रोत असणार आहे.

६) संशोधन विषयाची व्याप्ती आणि मर्यादा :-

प्रस्तुत संशोधन हे प्रामुख्याने फक्त आंबेडकरवादी कादंबऱ्यांच्या अनुषंगाने असणार आहे. त्यामध्ये इ.स. २००० ते २०२२ पर्यंत ज्या आंबेडकरवादी लेखकांनी आंबेडकरी चळवळीच्या अनुषंगाने कादंबरी लिखाण केले आहे. त्यातील भिम युग, सनातन, श्रद्धा, भेटलं मांग फिटल पांग, सुंभ आणि पिळ, उषःकाल, वॉन्टेड, फिरकी या निवडक कादंबऱ्या प्रस्तुत संशोधनासाठी निवडल्या जाणार आहेत. हे करत असताना १९६० पासून ज्या वेगवेगळ्या आंबेडकरवादी लेखकांनी आंबेडकरवादी कादंबऱ्यांची निर्मिती केली त्याचाही थोडक्यात परामर्श घेतला जाणार आहे. परंतु हा परामर्श फक्त आंबेडकरवादी कादंबऱ्यांची वाटचाल म्हणून याठिकाणी विचार केला जाईल ही या विषयाची व्याप्ती आणि मर्यादा असणार आहे.

७) संशोधन विषयाची प्रकरणनिहाय मांडणी :-

प्रस्तुत शोध प्रकल्प हा एकूण सात प्रकरणांमध्ये विभागला जाणार आहे.

१) प्रकरण पहिले : प्रस्तावना किंवा विषय प्रवेश :

हे संशोधन प्रकल्पाचे पहिले प्रकरण असून या प्रकरणामध्ये प्रामुख्याने संशोधन शीर्षकाच्या अनुषंगाने ज्या सबंध संकल्पना आहेत त्या सुरुवातीला स्पष्ट केल्या जातील. ज्यामध्ये प्रामुख्याने आंबेडकरवादी म्हणजे कोण? कादंबरी म्हणजे काय? चळवळ म्हणजे काय? इ. नंतर एकूण आंबेडकरवादी साहित्याचा थोडक्यात आढावा घेवून आंबेडकरवादी कादंबऱ्याचा ऐतिहासिक आढावा घेतला जाईल. तसेच चळवळीच्या अनुषंगाने आंबेडकरी चळवळीचे टप्पे किंवा अवस्था स्पष्ट केल्या जातील. त्यानंतर आंबेडकरी चळवळीमध्ये आंबेडकरवादी साहित्यिकांचे असणारे योगदान थोडक्यात स्पष्ट केले जाईल.

आंबेडकरवादी साहित्यामध्ये असणारी आंबेडकरी प्रेरणा थोडक्यात स्पष्ट करुन या प्रकरणामध्ये आंबेडकरवादी कादंबरी आणि आंबेडकरी चळवळीच्या अनुषंगाने असणारा परस्पर संबंध प्रभाव परिणाम स्पष्ट केला जाईल.

२) प्रकरण दुसरे :- आंबेडकरवादी कादंबरीतील वेदना आणि विद्रोहाचे चित्रण :-

प्रस्तुत प्रकरणामध्ये ज्या वेगवेगळ्या आंबेडकरवादी कादंबरी आहेत त्यातील निवडलेल्या कादंबऱ्यामध्ये व्यक्त झालेले दलितांचे वेदना आणि विद्रोहाचे चित्रण केले जाईल. हे वेदना आणि विद्रोहाचे चित्रण करत असताना सुरुवातीच्याही काही कादंबऱ्यांचा संदर्भ वेदना आणि विद्रोहांच्या अनुषंगाने घेतला जाईल. परंतु प्रामुख्याने इ.स. २००० ते २०२२ या दरम्यान ज्या प्रमुख आंबेडकरवादी कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत त्यातील वेदना आणि विद्रोहांचे वास्तव चित्रण या प्रकरणांमध्ये रेखाटले जाणार आहे.

३) प्रकरण तिसरे : आंबेडकरवादी कादंबरीतील अस्पृश्यतेचे चित्रण :-

प्रस्तुत प्रकरण हे शोध प्रकल्पातील तिसरे प्रकरण असून या प्रकरणामध्ये निवडल्या गेलेल्या आंबेडकरवादी कादंबऱ्यामध्ये कशा पद्धतीने अस्पृश्यतेचे चित्रण केले आहे, याचे स्पष्टीकरण करण्यात येणार आहे. अस्पृश्यता आणि आंबेडकरवादी साहित्य यांचा परस्पर संबंध आहेच बहुतेक आंबेडकरवादी साहित्यामध्ये अस्पृश्यतेचे चित्रण करण्यात आले आहे. याच अनुषंगाने निवडल्या गेलेल्या इ.स. २००० ते २०२२ दरम्यानच्या कादंबऱ्यामध्ये कशा पद्धतीने अस्पृश्यतेचे रेखाटन करण्यात आले आहे ते स्पष्ट करण्यात येईल.

४) प्रकरण चौथे : आंबेडकरी कादंबरीतील नवजाणिवा :

आंबेडकरवादी आणि त्यांची वेळोवेळी होणारी अवहेलना हे समाजातील वास्तव

आहे. प्रत्येक ठिकाणी आंबेडकरवादी म्हणून व्यक्तीची अवहेलना होत असते. सार्वजनिक व्यवहारात दलितांना अनेक वेळा अपमानाचा, अपराधीपणाचा सामना करावा लागतो. त्यांची वेळोवेळी मानहानी केली जाते, त्यांच्यावर अन्याय, अत्याचार केले जातात. दलित स्त्रियांवर अन्याय अत्याचार केले जातात, दलितांची घरे जाळली जातात. राजकारण, समाजकारण, संस्कृती, सार्वजनिक व्यवहार, शिक्षण या सर्वच समाजाच्या घटकांमध्ये दलित व्यक्तींना तो दलित आहे म्हणून त्याची अवहेलना केली जाते. साहित्यामध्येही असेच आहे. हे दलितांचे अवमूल्यन आंबेडकरवादी कादंबरीमध्ये कसे आलेले आहे याचे विश्लेषण प्रस्तुत प्रकरणामध्ये केले जाणार आहे.

५) प्रकरण पाचवे : आंबेडकरवादी कादंबरीचा आंबेडकरी चळवळीत प्रभाव किंवा परस्पर संबंध :-

प्रस्तुत प्रकरण हे या शोध प्रकल्पातील महत्वपूर्ण प्रकरण असून या प्रकरणामध्ये प्रामुख्याने आंबेडकरवादी कादंबरीचा आंबेडकरी चळवळीवर असलेला प्रभाव किंवा परिणाम स्पष्ट केला जाणार आहे. आंबेडकरवादी कादंबरी आणि चळवळ यांचा असणारा परस्पर संबंध स्पष्ट केला जाईल. आंबेडकरी चळवळीचा आंबेडकरी चळवळीवरील कशा पद्धतीने प्रभाव राहिला आहे किंवा निवडल्या गेलेल्या कादंबऱ्यामधून आंबेडकरी चळवळीला आंबेडकरी चळवळीचे केले गेलेले विश्लेषण स्पष्ट केले जाणार आहे. आंबेडकर उत्तर कालखंडामध्ये ज्या आंबेडकरवादी साहित्यिकांनी आंबेडकरी चळवळीला दिशा देण्याचे कार्य केले त्याचाही परामर्श या प्रकरणात घेतला जाईल.

६) प्रकरण सहावे : दलितामधील पांढरपेशीपणा किंवा ब्राह्मणवृत्ती :

प्रस्तुत प्रबंधातील या प्रकरणामध्ये अलीकडच्या काळात शिकलेल्या दलितांमध्ये कशा पद्धतीने पांढरे पेशीपणा वाढलेला आहे. शिकलेला नोकरदार दलित हा आपल्या मागे राहिलेल्या समाजापासून कसा दूर चाललेला आहे याचे विश्लेषण केले जाईल. दलितांमध्ये वाढत असलेला आपमतलबीपणा, आत्मप्रोडीपणा पांढरपेशीय वृत्ती ही निवडल्या गेलेल्या कादंबरीमधून कशी व्यक्त होते हे स्पष्ट केले जाईल. प्रस्तुत प्रकरणामध्ये त्याच अनुषंगाने दलितांमध्ये वाढत जाणारी ब्राह्मण्य वृत्ती त्यांची कमी होत जाणारी सामाजिक बांधिलकी याचे विश्लेषण केले जाणार आहे.

७) प्रकरण सातवे : निष्कर्ष आणि समारोप :

प्रस्तुत प्रकरण हे या प्रस्तावित शोध प्रकल्पाचे शेवटचे प्रकरण असून या प्रकरणांमध्ये अभ्यासांती जे निष्कर्ष प्राप्त होतील त्याची मांडणी केली जाईल.

परिशिष्ट - १

१) योगीराज वाघमारे भिमयुग, अभिनव प्रकाशन, पुणे.

२) शरणकुमार लिंबाळे, सनातन, दिलीपराज प्रकाशन, पुणे.

३) उत्तम कांबळे, श्रद्धा, मनोविकास प्रकाशन, मुंबई.

४) मिलिंद कांबळे, भेटलं मांग फिटलं पांग, सुविद्या प्रकाशन, सोलापूर.

५) ल. सि. जाधव, सुंभ आणि पिळ, सुविद्या प्रकाशन, सोलापूर.

६) मिलींद कांबळे, ठणक, अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर.

७) वामन जाधव, वॉन्टेड, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

८) बाळासाहेब भडकवाड, फिरकी, प्रतिमा पब्लिकेशन, पुणे.

परिशिष्ट - २

संदर्भ ग्रंथ :

१) फडके भालचंद, दलित साहित्य वेदना व विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.

२) खरात शंकरराव, तराळ अंतराळ, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे.

३) नलगे चंद्रकुमार, (संपा.), महाराष्ट्रातील सामाजिक विचार मंथन, सुरेश एजन्सी, पुणे.

४) देसाई व लिमये (संपा.), आधुनिक मराठी वाङ्मय दर्शन, लोक वाङ्मय ग्रह, मुंबई.

५) मनोहर यशवंत, आंबेडकरवादी मराठी साहित्य, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर.

६) लिंबाळे शरणकुमार (संपा.), भारतीय दलित साहित्य अकादमी, दिल्ली.

७) अर्जून डांगळे, दलित साहित्य, कवठेकर बाळकृष्ण, दलित साहित्य एक आकलन.

८) भगत दत्ता, दलित साहित्य दिशा आणि दिशांतर.

९) मनोहर यशवंत, दलित साहित्य सिद्धांत आणि स्वरुप.

१०)रिपब्लिकन पक्षाचा जाहीरनामा, रामचंद्र क्षीरसागर.

संशोधक

कांबळे पांडुरंग पंढरी
महात्मा फुले महाविद्यालय, किनगाव

मार्गदर्शक

प्रा.डॉ. कांबळे अनिल पंढरीनाथ
महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर
ता. अहमदपूर जि. लातूर